
उष:काल
प्रा. सौ. नलिनी महाडिक

३९७

यशवंत वाचनालय व ग्रंथालय
ACC NO- २८९
गोडोली सातारा.

# उषःकाल

प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडीक
M. A. Ph. D.

रवींद्र प्रकाशन

प्रकाशक :

**श्री. आबासाहेब महाडीक**
**रवींद्र प्रकाशन**
३८१, सोमवार पेठ,
(न्यू इंग्लिश स्कूल जवळ)
सातारा शहर.

▱

© **प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडीक**

▱

पहिली आवृत्ती १ सप्टें. १९९१

▱

मुद्रक :

**अजिंक्य सहकारी मुद्रणालय,**
५१२, छत्रपती शिवाजी रोड, कँप–सातारा.

▱

मुखपृष्ठ :

**मनोज वाघुलकर**

▱

मूल्य : ३५ रुपये

प्रिय दिदीस–

देणे–घेणे काही नव्हते
भारणारे शब्द होते
स्वप्नसंकेत केलास जेथे
उषःकाल झाला येथे

# अनुक्रमाणिका-


| | |
|---|---|
| ऋतुरंग | १ |
| नशा अमृताची | २ |
| चिरंजीव | ४ |
| हिमगिरी पुकारतो | ५ |
| पाझर | ६ |
| स्वप्नसती | ७ |
| पाखरा | ८ |
| नवलाई | ९ |
| भान | १० |
| फिर्याद | ११ |
| पोहे | १२ |
| ओंजळ | १३ |
| न्याय | १४ |
| अभेद | १५ |
| जात मानवाची | १६ |
| उषःकाल | १७ |
| दीप | १८ |
| परतत्व | १९ |
| नॉटपेड | २० |
| संचित | २१ |
| उत्तर | २२ |
| शोध | २३ |

| | |
|---|---|
| तृष्णा | २४ |
| बहाणा | २५ |
| आभास | २६ |
| इमान | २७ |
| वाटा | २८ |
| पूर्ती | २९ |
| शाप | ३० |
| अभयाचा ठेला | ३१ |
| गांधारी | ३२ |
| कहाणी | ३३ |
| अण्णासाळी | ३४ |
| भाता | ३७ |
| संशय | ३८ |
| सांज | ३९ |
| वृक्षदंड | ४० |
| खुर्ची | ४१ |
| सवाल | ४२ |
| बंगला | ४४ |
| अंकुर | ४५ |
| आस | ४६ |
| वात्सल्य | ४७ |
| चंद्रबिंब | ४८ |
| जिव्हार | ४९ |
| वरमाई | ५० |

# ऋतुरंग

लावून जीव होते तव मोकळ्या सुरास
घेऊन गंधवलये कवटाळिले ऊरास

केलास बोलबाला, मांडलीन् स्वप्नरास
गंधून धुंद झाली, मम प्रीतीची मिरास

ओतून रम्य भाव, केलीस तू आरास
येणार मीही होते त्या दिव्य मंदिरास

तडिता आघात झाला मम नांदत्या घरास
लावी मशाल कोणी हळुवार अंतरास

वळणावरी उद्याच्या, स्वप्नील पुष्परास
डोळ्यात पाहते मी त्या प्रीत आगरास

ऋतुरंग चिंब जेव्हा ये स्वप्न मंदिरास
विसरून रागरंग, उधळून रंगरास

येशील तू फिरोनी या भाव मंदिरास
उभी मी, आतुर आहे, मिळण्यास सागरास !

# नशा अमृताची

भरलास देवा साऱ्या चराचरी
आहे तुझ्या घरी । न्याय कुठे ? ।।

तुला म्हणे देवा लक्ष लक्ष डोळे
पेंगताती खुळे । नको तेव्हा ।।

आशीर्वाद–कृपा असा तुझा न्याय
मानेवरी पाय । अश्रापाच्या ।।

उन्मत्त उदंड भूमीलाही दंड
माजले हे पुंड । दारोदारी ।।

म्हणती दांभिक आम्ही पुण्यवंत
त्यांचा कृपावंत । तूच देवा ।।

धनिकांच्या घरी तुझ्या तसबिरी
चाले सावकारी । चक्रवाढ ।।

शपथ–विश्वास पाळेनात कोणी
भरतात गोणी । पापाची ती ।।

वर–आशीर्वाद, आण वा वचन
सारे अर्थशून्य । करतोसी ।।

फुलता निष्पाप कोमल ते फूल
पाडतोसी भूल । वणव्याची ।।

दुबळे पिडित आले आसऱ्याला
देई त्यास थारा । तोच मरे ।।

देऊनी विश्वास करताती घात
पुण्याचा निःपात । तुझ्यापुढे ।।

तुझी तरी काय वर्णावी थोरवी ?
पुण्याई गौरवी । पाप्याची तू ।।

घेऊनी शपथ मारताती थाप
करताती पाप । राजरोस ।।

आशीर्वाद–शाप कसला ? कोठला ?
बाजार लोटला । मतलबी ।।

चिमणीचे घर वणव्यात जळें
चाखताती तळे । मशालधारी ।।

काय तुझी लीला म्हणावी गोविंदा
सज्जनांची निंदा । कानी येई ।।

तुझी वजाबाकी पाप पुण्याईची
भलतीच कच्ची । आहे देवा ।।

उगा का लागतो संन्याशाला फास ?
चोराला सुग्रास । पोटभर ।।

अमृताची नशा चढली तुला का ?
जीव हा पोरका । संभ्रमात ।।

व्यर्थ जाणुनिया तुझ्या अस्तित्वास
न्याय–सात्त्विकास । का विसरू ? ।।

# चिरंजीव

भिंत आकाशी पाहुनी चांगदेव दंग
घाट भिवरेचा उभा वाजवी मृदंग

कोंडी ज्ञानेश स्वतःला होता मानभंग
कैवल्याचे द्वार उघडी ताटीचे अभंग

विसरुनी लोकाचार नाभा झाला नामी दंग
मागे झोळीत जोगवा मुखी मुक्ताचे अभंग

इंद्रायणी पोटी गेले तुक्याचे अभंग
चिरंजीव होऊनी येता झाले बुडवे दुभंग

नसती ढंग माहित त्यांना, नव्हतेच रंग
हृदयाच्या विटेवरी उभा पांडुरंग

# हिमगिरी पुकारतो

उठा ! उठा ! ! उठा झणी ! उठा झणी ! !
पुकार ये क्षणोक्षणी, शिंग फुंकिले रणी ॥

दुर्योधन मातला, प्रमत्त अंक फोडण्या उठा चला
दुःशासन दर्पला, आसुर शोभला खरा उठा चला ॥

प्रमत्त, रक्तभुक्त हे शिरकान होऊ द्या चला
षड्रीपुस शापिण्या, शस्त्र घ्या उठा चला ॥

सप्तगिरी, विंध्य तो, सह्य असह्य जाहला
रावणास विंधण्या, शिवधनुष्य घ्या चला ॥

स्फुल्लिंग आतला भला तेजाळून फाकला
कंसराज मर्दण्या स्वार व्हा, उठा चला ॥

अमृतास आणण्या गरुडझेप घ्या चला
परजून शस्त्र जिव्हार हे हिमगिरी पुकारतो ॥

# पाझर

असे एकदा नटले अंबर
नक्षत्रांनी लाख
विझून गेली आज कौमुदी
नजरही झाली खाक
तू असताना दुःख वाटले
परागाचे काटे
अनाथ झाले सौख्य आजचे
काटेरी पाते
पोरक्या अश्रूत दिसतो
कारुण्य सागर
सागरात आज आठवे
मायेचा पाझर
भल्या संगतीत भासे
स्वर्ग धरित्रीचा
अपरोक्षी लागे थांग
भल्या करणीचा
उल्हासले मन तेव्हा
चंद्रसूर्य हाती
मोल आस्तित्वाचे कळे
माया आणिकांची
दगडांची रास भासे
रत्नमाणिकांची

# स्वप्नसती

फुला-फुलांचा विणला प्रियकर
मीपण झाले फुला-फुलांचे
विणून झाले कितीक शेले
स्वप्न फुलांचे मऊ गालीचे

स्वप्नफुलांच्या स्वर्गामध्ये
खेळ खेळलो फुलाफुलांचे
भावजगी त्या श्रवणी आले
किलबिलणे ते फुला-मुलांचे

आणि अचानक तुटे मालिका
स्वप्न उरीचे फुला-फुलांचे
जाणीव होता वास्तविकाची
गहन प्रश्न ते वात्सल्याचे

स्वप्नसती मी, सौंधावरती
दर्शन होते स्वप्नसख्याचे
स्मित तयाचे सांगून जाते
हे संजिवन जीव स्वप्नाचे

# पाखरा

उंच नभीच्या मुक्या पाखरा
नको दाखवू उगाच नखरा
ये साधुनी या एकांती

तुझे नि माझे अबोल हितगुज
वाजे हृदयी अमूर्त अलगुज
लाभेल जीवाला शांती

तुझ्या नि माझ्या सुसंवादी
साक्ष कुणाची, नकोच चिंतन
निःशब्द तोष प्रेमांती

वस्त्रांन्नाची खंत तुला ना
निवाऱ्याची व्यर्थ वल्गना
लाभो साथ तुझी सायंती

# नवलाई

हृदयी कोंडुनी क्षितिजालाही
सूर्य पाहिला नाही
अनेक गेल्या काळच्या रात्री
नभी चंद्र उगवला नाही
काळोखाच्या महावस्त्रावर
नक्षत्रांची जाळी
खुणावते ही तिन्ही-त्रिकाळी
कधी वेळी-अवेळी
जे असावे ते नसे परन्तु
असते काही काही
पाऊल अडते अलगद पडते
ही नशीबाची नवलाई !

## भान

अलवार मर्म माझे
तुझ्या करात मी दिले
घुसे खंजीर पाठीत
मेल्याआधी प्रेत झाले

अनाघ्रात स्वप्न माझे
तुला जपण्यास दिले
कुस्करुन कळीलाच
चव्हाट्यात छिन्न केले

तुझ्या संगतीचे विष
माझ्या मस्तकात गेले
छिन्न नजरेचे भिंग
भान हस्तकांनी दिले

# फिर्याद

दोष काट्यांचा कुठें हा ?
काटे फुलातून आले !

हास्य शत्रूचे कुठले ?
हासू मित्रत्वाचे झाले !

दास्य प्रीतीचे नव्हे हे
भाग्य शापितांचे झुले !

जीवलग कोठे गेले ?
सारे जीवालाच भ्याले !

स्वप्नमहाल कोणते ?
अहो, कब्रस्थान आले !

घाव छातीवर कसे ?
भाले पाठीतून आले !

# पोहे

आठवाच्या या शेल्यात
दिल्या घेतल्याची फुले

काही दिली मी कोणास
बांधण्यास स्वप्नझुले

काही राहिली अभागी
खंत काळजात उले

कोणी 'घेता' ना समर्थ
हीच व्यथा मनी सले

चकव्यात व्यर्थ गेले
कशी दिशाभूल झाले

माझ्या मातीच्या भेटीला
पोहे सुदामाचे झाले !

# ओंजळ

भूल प्रीतीच्या फुलांची
चिखे प्रवादी वाघुळ
उभ्या रातीच्या उरात
जागे चंदेरी आभाळ

कैफ तुझ्या स्वामित्वाचा
जनी संशय कल्लोळ
चाले बाह्यांगीच निंदा
मनी आनंद कल्लोळ

एका मामुली मातेचे
भरे उरी स्वप्नचळ
पुऱ्या फाटक्या आभाळी
वीज-दाभणाचा खेळ

लोभ मातीच्या चुलीचा
मन त्याहून सोवळं
तीन दगडांचे पायी
लागे त्रिखंडाची झळ

माझ्या पोळल्या हातात
नको फुलांची ओंजळ
आस फुंकरीची लागे
राहु द्या हो गंगाजल !

# न्याय

त्याला आता कोडंच पडलं कसं ?
की, ती त्याची 'जीवलग'च असं !

त्याचा एकेकाळचा कलिजा
उडविला आज त्याचाच फज्जा

त्याच्या जवळचं आयुधाचं ओझं
तिनं मागितलं लाजं-काजं

आणि पुन्हा 'शस्त्र तुझीच' म्हणून
जखमीलाच गेली हिणवून

असं कसं विपरीत झालं ?
तिनं त्यालाच पारध केलं ?

जन्माचा साथी, जीवाचा सोबती
पण त्यालाच गारद केलं !

# अभेद

न म्हणता लाच
पण सांगितलेली 'खुशी'
दोन्ही एकच असतात लाचारीचा पदर धरुन

न कळलेला दोस्त
अन् ओळखलेला शत्रू
दोन्ही सारखेच असतात पाठी-पोटावर भाले रोखून

ठोकरलेलं आध्यात्म
नि पांघरलेलं आध्यात्म
दोन्ही अभेदच असतात असत्याशी पाट लावून

संतापलेलं भग्नमन
अन् खुशीतलं प्रसन्नमन
दोन्ही वाटचाल करतात दगाबाजाशी फारकत घेऊन

मोडलेलं वचन
अन् तोडलेली शपथ
दोन्ही भ्रष्टच असतात सोय-स्वार्थाशी व्यभिचार करून

# जात मानवाची

मानती उपकार सारे पूर्णतेच्या श्रेयसाचे
मेले शिपाई, सरदार तुम्ही त्या यशाच्या वारसाचे

भव्य प्रासादास तुमच्या रक्त अश्रुंचा गिलावा
सडक सम्राटास तेथे काय थंडावा मिळावा ?

मतलबी उपकार तुमचे चालती काठावरी
भोवऱ्याला नाव जाता आन्हिके घाटावरी

पोसतो विषगर्भ तुमचा पाहता दुज्याची लेकरे
पोटची का वाटताती सद्‌गुणी ती पाखरे ?

कोण तुम्ही सांगणारे जातीचे मार्तंड हो ?
संस्कृतीला मानता का मतलबी उतरंड हो ?

सोयीचे ते सत्य, त्याचा कोरडा डंका फुका
लाळघोटया तुमच्या जीण्याची जात धिक्काराल का ?

जात मोठी लावुनिया करणी खोटी चालते
बूट चाटुनी कुणाचे ? चरणी पडता पालथे !

जातीचा मिरवुनी दिमाख जात का डागाळता ?
मानवाची जात असता व्यर्थ प्राणी वाटता !

# उषःकाल

एका रातीच्या मनात
सत्य डवरुन आले
आसू-काळोखाचे ओझे तिच्या शेल्यात साठले

तिच्या रिकाम्या ओटीत
दाट काळोख घाटले
उभ्या रातीचे अंधारी ऊर फाटले फाटले

बहरली काळ रात्र
मन सुन्न चक्रावले
चांद पुनवेचा स्वर्गी तिज भ्रमला वाटले

तिच्या दुःखाचे उमाळे
आणि अश्रू मावळले
नाही चंद्र पुनवेचा, झुंजूमुंजू प्रभाळले

हर रातीच्या ललाटी
नसे रुपेरी चांदुले
परी ओटीत वाढते उषःकालाचे तान्हुले

जाण प्रकाशाची येता
तिने नेत्र विस्फारिले
रवी किरणांचे स्पर्श तिने मोक्ष अव्हेरिले !

# दीप

दीप माझा तेजाळला
पुन्हा विझुनिया गेला !

दीप विझुनिया गेला !
कसा विझुनिया गेला ?

कुणी विखारी फुंकर
अशी घातली तयाला ?

कसा अवचित असा
दुष्ट झंझावात आला ?

नाही घातली फुंकर
नाही वात झंझावला

स्नेह आतला आटला
दीप विझुनिया गेला !

# परतत्व

आज मोगरा फुलला
कसा मोगरा फुलला ?
नाही पाणीही वेळेला
तरी शुभ्र फुलारला

नाही माळी जिव्हाळ्याचा
नाही वारा फिरकला
परी मोगऱ्याचा वेलु
जीवें वरी सरकला

नाही भ्रमरांची दाटी
गाया स्तुतीच्या गुलाला
परी मोगऱ्याची माला
लागे उधळू गंधाला

लागे कवित्व स्फुराया
बरवे रसिक तत्वाला
स्पर्श रसिकाला होता
आले परतत्व फळाला

असा अंतरीचा हेतु
असा जिव्हार मिळाला
भावभक्तीचिया लोभा
लाभे ईश्वर जीवाला

# नॉटपेड

पत्र 'नॉटपेड' आले
जीव कासावीस झाले
झाले शिमग्याचे गीत
असे त्यांनी काव्य केले

"आले मरण जीवाला
काय वेगळाले झाले ?
पत्र आम्हास धाडून
काय मोठेपण दिले ?"

धाडा उत्तर तयांना
"पत्र तुमचे मिळालें
सोडवून घेता ठेवा
खार पदराला जाळे"

अशा भेकडांचे ओठी
हास्य कुचेष्टेचे आले
मरे कोणाचे हो कोण
यांना पाहिजे पाहिले

तत्वज्ञानच फुकाचे
यांची बोलाचीच बात
कढी बोलाचीच केली
बोलाचाच केला भात

भोवतालच्या साऱ्यांनी
एकमेका दिली साथ
व्यथा आपुल्या सांगून
मरणाची केली बात !

# संचित

गर्दीत मी असोनी, तशी एकटीच आहे
हे हास्य-शब्द फसवे, जाणून स्वस्थ आहे

आपुलाच स्वार्थ-सौख्य पामर कुणीही पाहे
हा धर्म कलियुगाचा लावून अर्थ पाहे

निष्ठा, खुणा मनाच्या जणु लोपल्याच पाहे
तरी मी तयात माझे हृदयस्त शोधिताहे

कोणी वृथाच येथे अडवून स्थान आहे
वाड्यात चिरेबंदी श्वानास मान आहे

ती लाच-भूक नाही, मी दूर वंचिताहे
हे भाग्य या जीवाचे की पूर्व संचिताहे ?

खाणीत कोळशाच्या मी रत्न धुंडिताहे
द्याया हिशेब त्याचा आयुष्य मांडिताहे

# उत्तर

एक दार ...
नाहीऽऽ नाहीऽऽ म्हणत
उघडले .. ...
आयुष्य नाकारले
नकार साकारले ...... ..
दोरखंडाच्या वेटोळचात
टांगलेले ... ..
एक स्वप्न होते
भंगलेले
पाहणाऱ्यांच्या डोळचात
का? कशी? केव्हा? काय? कोठे? वगैरे वगैरे .
खोल खोल तळचात
निर्जिव डोळचात
नकाराचं एकच उत्तर ........ !
असंख्य उघडचा डोळचात
बेवारसी प्रश्न सत्तर

# शोध

म्हणे–
कुरुंच्या दरबारी
हजारो डोळ्यांनी

पाहिला हरी
वस्त्रे पुरविणारा !

आणि तिथं पासून
आमचे डोळे

तहानेलेत हरीसाठी

शोधतात हरीला .. ...
पाहतात – ऐकतात
अनुभवतात कित्येक द्रौपद्या
होताना विवस्त्र एका कृष्णासाठी !

हृदयातला हरी
झोपवून उरी
शोध चालू आहे
दारोदारी .. !

# तृष्णा

घडला गुन्हाच उशिरा कळला
जीव हा पोळला । सहजची ।।
तुझ्या-माझ्याजगी दिवस आंधळा
रातीचीच शाळा । ज्ञान देई ।।
किती दिवसांनी भेटशील देवा
वाटेल बा हेवा । निष्ठुराला ।
आकाशाची गंगा धावे भूमीवरी
पाप ते सत्त्वरी । सुचिर्भूत ।।
तुझे आगमन माझ्या खोपटात
मी तुझ्या पटात । विणलेली ।।
अमृताची तृष्णा मला न लागते
दर्शनी भागते । भक्ती माझी ।।
तुझा-माझा खेळ पाठ शिवणीचा
उगा जिवणीचा । शीण होई ।।

# बहाणा

श्वासाहून खरे
माझे हे निःश्वास
खात्रीचे आश्वास । उच्चारती ।।

माझ्या या मनाची
मनोबंद खात्री
जाहली धरित्री । पावसाळी ।।

प्रथम दृष्टीत
ठसलास तेव्हा
श्वासही सव्वा । घेतला मी ।।

एकदा आलास
भरून आभाळ
घामाने हे भाळ । डवरले ।।

भेटशी एकदा
काहिली उन्हात
मावेना मनात । सावली ती ।।

असाच एकदा
सावरला तोल
शक्ती माझी फोल । असूनही ।।

क्षण संकटाचे
वरी विजयाचे
सामर्थ्य जयाचे । जाणते मी ।।

कोठे का असेना
सृष्टीचा तू राणा
तुझा तो बहाणा । दिपवितो ।।

# आभास

तो गंधावला परी ना लाभला
उगी वेढल्या सारखा मला वाटला

असा दर्वळुनी एक झोत गेला
स्मरता पुन्हा हुंदका दाटला

# इमान

"तू भेट देवा"
असे बोलले मी
भेटून जाशी परी
ना जाणिले मी

होतास पाठी
पहाडा प्रमाणे
आठवात आता
उरली इमाने

## वाटा

तुडविल्या सदा मी
अशा पायवाटा
शिरी चैत्रताप अन्
पायी फुफाटा

अशा कैक वाटा
चढ–आडवाटा
फुटे नको तेव्हा
पुन्हा एक फाटा

# पूर्ती

दिला जन्म त्याला
तू स्वप्न देरे
स्वप्नास भल्या त्या
आनंदकंद देरे

दिले ज्यास तारुण्य
तू प्रीत देरे
प्रीतीस त्या
जनभान देरे

भानास त्या
सौभाग्य काल देरे

# शाप

नको भेटू मजला
पुन्हा मायबापा

घेशील पापा
देशील थापा

बुजुनी जातील
या दुःखखापा

सोडू कुठे मी
ललाट शापा ?

# अभयाचा ठेला

दिवसा ढवळ्या
स्वप्नात पाहते
दुथडी वाहते– तुझ्यात मी ।।

अवचित हाती
लागे स्वप्न एक
प्राणाचीही भीक– काही नव्हे ।।

निर्गुण– नाकार
तुझीच जाणीव
तेवढी उणीव– नाही मज ।।

तूच माझ्या जीवा
होऊनिया शेला
अभयाचा ठेला– सापडशी ।।

नाही भय मज
कुण्या दुर्जनाचे
चित्तावरी नाचे– मूर्ती तुझी ।।

नाही तुझा जाच
नाही तुझा बंद
ना तरी बेबंद– तुझ्यासवे ।।

# गांधारी

सत्यधर्म तो
गांधारी सम–
पोटच्या असत्यास शापून
पाठच्या असत्यावर कोपून
निरपेक्ष जळणारा

सत्यधर्म तो
गांधारीचा–
स्वतंत्र, निर्भर, चैतन्यरुप
पाठमोऱ्या सत्यास पुकारणारा
पाठ त्याची नाकारणारा
सत्यासाठी–सत्यालाच ललकारणारा

सत्यधर्म असे
गांधारीचा–
भगवंताच्या शब्दास
निःशब्द करणारा
प्रारब्धास
विश्रब्ध करणारा !

# कहाणी

आवाज 'आई' म्हणोनी
पडतो सुरेल कानी
सांगे सखी मनाशी
आपुली आयुष्य कहाणी

होते फुलुनी गेले
घरटे तिन्ही फुलांनी
गंधात नहात होते
साऱ्या भल्या सुखांनी

येता सारे स्मरूनी
नयनात अश्रू भरूनी
सांगे सखी मनाशी
आपुली आयुष्य कहाणी

'आई' म्हणून श्रवणी
पडती तुषार कानी
घायाळ बनुनी हरिणी
गाते मनी विराणी

# अण्णा साळी

अण्णासाळी रोज सकाळी
घेत होता गोळी गोळी

घरात चाले शिमगा होळी
याची आपुली रोज दिवाळी

आली एकदा उचले टोळी
घेऊन गेली त्याची शेळी

बाईल त्याची खुळी–बावळी
आणते कष्टून बांधून मोळी

विकून मोळी भूक जाळी
रोज कष्ट हे तिच्या कपाळी

फडक्याची अन् करून झोळी
अण्णा साळी मागे पोळी

फिरत असतो आळीन् आळी
कोण देईल वेळोवेळी ?

घेत असतो मधल्या वेळी
अफू-गांजाची गोळी गोळी

उतरे नशा उतरे गोळी
शोधू लागतो आपुली शेळी

मध्येच म्हणतो "बाईल भोळी"
तुम्ही पाहिली, आहे दुबळी ?

परी गोजिरी नाकी डोळी
नाव सांगते राधा साळी

आली जेव्हा उचले टोळी
बाईल माझी आफत टाळी

देऊन त्यांना आपुली शेळी
लपण्यास मला देई कांबळी

असे सावळी दिसे बावळी
पुरी वेंधळी-प्रेम आंधळी

नशेत चढता अण्णा साळी
रोज खेळतो असली खेळी

उठून लगबग रोज सकाळी
नशेत गातो नवी भूपाळी

"बाईल माझी साधी भोळी
रोज लावते टिळा कपाळी"

ऐकून नेते हात कपाळी
जपून कुंकू खुळी कळवळी

पाहून सारे अण्णा साळी
मनापासूनी अश्रू ढाळी

म्हणतो, "देवा, ! कृपा आपली
असली बाईल नसती खपली

मीच करंटा माझ्या भाळी
येऊन नटली राधा साळी

उगीच जेव्हा तेव्हा जपली
असून बावळी, म्हटली आपली"

थांबून थोडे म्हणतो साळी,
"एकच गोळी सांज सकाळी"

राधा सांगे कानी कपाळी
"नशीब माझे लई दुष्काळी"

"सोडा गोळी, आपण साळी
काय सौख्यपण आपुल्या भाळी ?"

ऐकून साळी देतो गाळी
नेते राधा हात कपाळी
रोज चालते अशी—भूपाळी

# भाता

तो विव्हळला म्हणून
सर्वांगाच्या जखमा कवटाळून
त्याच्या सांत्वनाला आली ती
तेव्हा समजले ... -
त्याचा भाताच रिकामा झालाय !
आणि ती शेवटची जखमी झाली
कळवळून त्याला म्हणाली ........
" आता तरी हास ना ! "

## संशय

गोष्टीतील राजा–राणी
भाबडी अन् चिऊ–काऊ

ऐकुनिया झाले मन
असे लोण्याहून मऊ

दर येणारी घटिका
मज वाटताहे बाऊ

काही वेळा अशा आल्या
फुटे आसवांचे प्याऊ

साऱ्या जखमाच ओल्या
कशा उघडुनी दाऊ ?

तशा दाविल्या एकदा
कशी विसरून जाऊ ?

न लावाल मशाल
कसा भरवसा ठेऊ ?

मित्र द्रोहाचीच पुन्हा
कशी परीक्षा मी घेऊ ?

नाही मनुष्य पारख
का आत्मदोष देऊ ?

# सांज

अशीच होती सांज सावळी
नजरही होती उगी बावळी

त्या नजरेच्या घरट्या मधुनी
गंधुनी उमले कल्पना खुळी

हिरव्या हिरव्या गालीच्यावर
फुले बहरली निळी जांभळी

गौर गुलाबी गालावरती
पडे निरागस गोड खळी

रान केवड्या राना मधुनी
नजरही झाली खुळी

## वृक्षदंड

मी स्वागतास तुमच्या
असा वृक्षदंड आहे

किती वसंत आले–गेले
नाते जीवांशी जडले
अशा घडण्यात माझ्या
मी दयावंत आहे .. ....

फुले फुलली अनेक
कळ्या खुडल्या कित्येक
अशा लुटीतही माझ्या

माझा मानदंड आहे .. .. ..

पाय मातीत रूतले
हात आकाशी गुंतले
मी अरण्यात माझ्या

असा भाग्यवंत आहे .. .. ..

# खुर्ची

ती खुर्ची साऱ्यांनीच नाकारली
म्हणून जिज्ञासेनं निरखली

तिच्या चारी पायांना साऱ्यांचेच हात होते
साऱ्यांच्या नजरेत त्याचेच तर भय होते !

ती खुर्ची साऱ्यांनीच नाकरली
म्हणून मी स्वीकारली
आणि ......

तिला अचानक मागणी आली
'मागणी'च घायकुतीला आली तेव्हा

मी म्हणाले,

"घेईना का भली
आपल्या शिवाय आहे कुणी तरी वाली"

खुर्ची दिली नि मनगटातून कळ आली
पाह्यलं– मनगटावरच खुर्चीचं पाय टेकलं
माझंच दान माझ्यावर शेकलं

तेव्हा उमजलं–

कोणाचे काही का असेना
खुर्ची म्हणजे राक्षसगणी मेना !

# सवाल

दान देण्या दाता आला
जीव माझा संकोचला

माझा फाटका पदर
त्याच्या पुढे पसरला

परी दान देण्या दाता
भला विसरून गेला

नाही त्याची खंत मला
परी माझ्या पदराला

साऱ्या जगताचा राणा
खार लावुनिया गेला

येई धावुनी स्वारी त्याची
असे ऐपत मोठी ज्याची

धन पाहुनी कृपा त्याची
'दयाधन' कीर्ति त्याची

कडा संकटाचा येता
नवसाची लाच घेतो

राईचाच दाणा देण्या
किती बहाणा करितो ?

कधी भेटलाच कोणा
आणि हसला–बोलला

माझा एवढा सवाल
तधी ऐकवा तयाला

"अलिंगुनी तुझे पायी
आहे भरवसा काही ?

न मागताही काही
कारे रडवितो धायी ?"

# बंगला

वाळूत रंगला खेळ खेळात संपला वेळ
कारागीर आम्ही सान बंगले बांधिले छान
दगड, विटा अन् माती कश्शाचीच जरूरी नव्हती
बांधिले किती सुंदरसे वाळुचे इमले इवलेसे
पुळणीच्या वाळुवरती नटली ती आमुची धरती
नयनांचे झाले शिंपले बंगले पाहता आपुले
मोत्या परी जपले त्याते वाळुचे जरी ते होते
अंधारुन जेव्हा आले खेळगडी बावरुन गेले
पाखरे निघाली घरला बाळांनी रस्ता धरला
हृदयांतरी मोठी आस गुंतली नदीवर खास
माझाही होता सुरेख बंगला किनारी एक
निघता सोडून तयाशी दाटुनी आले गळयाशी
मनबाई भरूनी आले जधी सोडुनी त्याशी आले
स्वप्नीच कितीदा दिसला मनहारी माझा बंगला
पहाटेला जागी झाले नदी काठी धावत आले
वाळुविन मजला काही पुळणीवर दिसले नाही
कुणी दुष्टाने तुडविला की तो विरून गेला ?
नाहीच उमजले बाई बंगलाच दिसला नाही
तेजाळ विजेचे पान मनी देऊन गेले भान
हातामधी स्फूर्ती होती वाळूही सरली नव्हती
त्यातूनच गमले मजला बांधीन पुन्हा मी बंगला!

# अंकुर

त्या श्रावण संध्याकाळी
तरुतळी उभी मी होते
हळदुली उन्हाची दुलई
मऊ तुषार भिजवीत होते

सावळ्या पिसाऱ्या खाली
मन विभोर झाले होते
पाण्याच्या थेंबावरती
अनवाणी नाचत होते

गुलमोहर फांदी वरती
रावे ते थांबून होते
वाऱ्याच्या लाटांवरुनी
अलगुज निनादत होते

विश्रब्धच होती धरती
अंकुर हुंकारत होते
सांजेला करूनी छटा हात
फांदीस पुकारत होते

आश्वासून सांगत होते
आम्हीच उद्याचे नेते
त्या श्रावण संध्याकाळी
मजलागी गमले होते

## आस

जरी बोलले मी कटु वा वावगे
जाऊ नको रागे । परस्पर ।।

तुझ्या वाचून मी सदाच दुभंग
होऊन अभंग । सांधशी तू ।।

माझ्यासाठी तूच आकाश धरणी
कोणाची करणी । तारी मज? ।।

तुझ्या लोभापायी झाले अगतिक
मागितली भीक । निलाजरी ।।

तुझी माझी भेट एकदा घडावी
सदाची बुडावी । ताटातूट ।।

घडेल एकदा तुझा माझा संग
होईन निसंग । वाळवंटी ।।

# वात्सल्य

आषाढ सरीचा पाऊस झडावा
सारे चिडीचिप गारवा पडावा
चिखल–पाण्यात नागडेच पाय
घराकडे धाव वावगे ते काय ?

कोवळया कदाची छबी डोळयापुढे
फाटक्या शेल्यात राजस पहुडे

कातर सांजेला हंबरते गाय
साद पाडसाची, उधळते पाय

जरी दयाधन दुर्बला घातक
पाडितो अकाल, घायाळ चातक
परी अरूपाचे रूप कृष्ण कान्हा
वासरा पाहुनी उचंबळे पान्हा

चिमणीच्या दारी तिची चिवचिव
विनवी पावसा 'माझी तुला कीव

आम्हा दुर्बलांचा तूच दयाधना
पिलांना आणीन पाणी–दाना'

# चंद्राबिंब

त्या शारदरात्रीला मी
ही अशी बरसले होते
सर कोसळली वळीवाची
डोळेही पुसले नव्हते

तू शब्द दिला जरी नव्हता
मन माझे सांगत होते
तू येशील येशील म्हणुनी
मी डोळे मिटले नव्हते

त्या अबोल खिडकी मधुनी
मी तुला पुकारीत होते
दर्शनी अधीरी होऊन
बेचैन बावरी होते

मम टपोर नजरे पुढती
तव चंद्रबिंब ते दिसले
अन् खटचाळ नजरेने ते
मज पाहून गाली हसले !

# जिव्हार

तुला गीत गाता गाता
मीच वेडे गीत झाले
पंच पंच उष:काली
भूपाळीत सामावले

फुले गुंफिता गुंफिता
फूल आपणची झाले
तुझ्या जिव्हारा लागून
तुझी होऊनिया गेले

ज्योत ज्योतीने लाविता
वेडी मीच ज्योत झाले
तुझ्या स्नेहात भिजुनी
अशी एकरुपा आले

# वरमाई

सानुलाच ओटा माझा
सानुलीच याद
मनी उचंबळु जाता
भिजविते घाट
बाहुली छकुली माझी
बाहुलीचा यार
लुटुपुटीच्या लग्नात
वऱ्हाडयांचा थाट
माऊली मवाळ माझी
माऊलीची याद
जाई मायेने भिजुनी
सुरेलशी साद
डाफरली माझ्यातली
लुटुपुटी आई
' नक्को ! बाई मारू हाक
इथे लगीन घाई
तुझी सदा रांधा–वाढा
नेहमीचीच घाई
माझ्या मागे ढीग कामे
मीच वरमाई ! '



## प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडीक

- विवाहानंतर दहा वर्षांनी महाविद्यालयीन शिक्षण.
- १९८२ साली शिवाजी विद्यापीठाच्या एम्. ए. परीक्षेत् मराठी विषयात सर्वप्रथम.
- उमागिरीश व माधव ज्युलियन पारितोषिकांचा मान.
- १९८३ साली रयत शिक्षण संस्थेत प्राध्यापिका म्हणून सेवाप्रवेश.
- प्रसिध्द साहित्य :

  'रानवारा' (ग्रामीण कथा संग्रह)

  'लागीर' (ग्रामीण कथा संग्रह)

  'प्राची' (काव्य संग्रह)
- कथास्पर्धेची व काव्यस्पर्धेची अनेक पारितोषिके प्राप्त.
- 'मराठी राजकीय कांदबरी' (१८८५ - १९८५) या प्रबंधास शिवाजी विद्यापीठाकडून पीएच्. डी. पदवी प्राप्त.
- सध्या छ. शिवाजी महाविद्यालय, सातारा येथे मराठी वाङ्मयाच्या प्राध्यापिका.